<u>प्रेसनोट</u>

दि.१०/०६/२०२१

## सजा शिक्रापूर ता. शिरूर येथील तलाठी व खाजगी इसमावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
| गुन्हा नोंद क्रमांक | शिक्रापूर पोलीस स्टेशन, गु.र.नं. ४११/२०२१ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम – ७, ७ अ |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) लोकसेवक अविनाश केवलसिंग जाधव, पद - ३२ वर्षे. पद - तलाठी सजा शिक्रापूर ता. शिरूर,जिल्हा पुणे. २) पंडीत उमाजी जाधव, वय - २९ वर्षे खाजगी इसम. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३०,०००/- पडताळणी दरम्यान तडजोडीअंती २५,०००/- (पंचवीस हजार रूपये) |
| लाच स्वीकारली रक्कम | — |
| थोडक्यात माहिती. | पडताळणी :- दिनांक ०४/०१/२०२१, दि. ०७/०१/२०२१, २१/०१/२०२१, व ०८/०२/२०२१<br>गुन्हा दाखल दिनांक :- दिनांक ०९/०६/२०२१<br>यातील तक्रारदार यांचे पत्नीचे नावे शिक्रापूर येथे एक गुंठा जागा विकत घेतली आहे. सदर जागेची नोंद सातबारा उताऱ्यावरं घेण्यासाठी यातील आरोपी लोकसेवक यानी प्रथम ३०,०००/- रूपयांची लाचेची मागणी करून तडजोडीअंती २५,०००/- रूपये लाचेची मागणी करून ती लाच रक्कम आरोपी क्रमांक २ यांचेकडे देण्यास सांगितली, त्यास आरोपी क्रमांक २ यानी सहाय्य करून तक्रारदार याचेकडे लाच रक्कम मागीतली म्हणून वरिलप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हयाचे तपासकामी मा. न्यायालयाने ३ दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केली आहे. तपास श्रीमती अलका सरग, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे युनिट या करत आहेत. |

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे, श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे,पोलीस उप-आयुक्त/पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. <u>हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४</u>
२. अॅन्टीकरप्शन ब्युरो, पुणे -
   दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी- पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. फेसबुकपेज- www.facebook.com-maharashtraACB
७. वेबसाईट- www.acbmaharashtra.gov.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उपअधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.